**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कडेगांव यांच्या न्यायालयात,**
**ता.कडेगांव, जिल्हा सांगली.**

**नियमीत दिवाणी दावा क्र. १००/२०२१**

**प्रकाश भगवान पवार वगैरे ...... वादी**

**विरुध्द**

**बळवंत महादेव भोसले वगैरे ...... प्रतिवादी**

**निशाणी ५ वरील आदेश**

१. निशाणी ५ वरील अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द अर्जातील परिच्छेद क्र. १–अ ते १–ड मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी (तिला दावा मिळकत अ ते ड असे संबोधण्यात येईल) तुर्तातुर्त मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. **वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

दावा मिळकत अ ही मुळची भगवान रामचंद्र पवार, शिवाजी रामचंद्र पवार व दिनकर रामचंद्र पवार यांची वडिलार्जीत मिळकत आहे. वादी क्र. १, २ ही भगवान यांची मुले आहेत. वादी ३, ४ ही शिवाजी यांची मुले आहेत. दावा मिळकत अ मध्ये भगवान, शिवाजी व दिनकर यांचा प्रत्येकी ५ आणे ४ पैचा हिस्सा होता. भगवान व शिवाजी मयत झाल्यानंतर दावा मिळकत अ ला वादी क्र. १ ते ४ यांची नावे तश्याच हिश्याने नमुद झाली आहेत.

दिनकर यांनी दावा मिळकत अ मधील त्यांच्या ५ आणे ४ पै हिश्यापैकी १ आणे ९ पैचा हिस्सा प्रतिवादी क्र. १ चे पूर्वाधीकारी विलास अंतू भोसले, महादेव अंतू भोसले व श्रीनिवास बाजीराव भोसले यांना खरेदी दिला. विलास, महादेव व श्रीनिवास यांनी तो १ आणे ९ पैचा हिस्सा महादेव वसंत भोसले यांना खरेदी दिला. महादेव यांनी तोच १ आणे ९ पैचा हिस्सा पुन्हा प्रतिवादी क्र. १ यास खरेदी दिला. दिनकर यांनी दावा मिळकत अ मधील त्यांच्या ५ आणे ४ पै हिश्यापैकी २ आणे ८ पैचा हिस्सा प्रतिवादी क्र. २ ला खरेदी दिला व ११ पैचा हिस्सा प्रतिवादी क्र. ५ ला खरेदी दिला. प्रतिवादी क्र. ५ ने तो ११ पैचा हिस्सा प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना खरेदी दिला. म्हणजेच दावा मिळकत अ

मध्ये वादी क्र. १ व २ यांचा ५ आणे ४ पै हिस्सा, वादी क्र. ३ व ४ यांचा ५ आणे ४ पै हिस्सा, प्रतिवादी क्र. १ चा १ आणे ९ पै हिस्सा, प्रतिवादी क्र. २ चा २ आणे ८ पै हिस्सा व प्रतिवादी क्र. ४, ५ यांचा ११ पैचा हिस्सा आहे.

दावा मिळकत अ पैकी २ हेक्टर २० आर क्षेत्र मा. भूमि संपादन विशेष अधिकारी क्र. १२ मिरज यांचे आदेश क्र. SPL/LAQ/SR/5/98 नुसार **उध्वगामी** नलीका टेंभू उपसा जलसिंचन प्रकल्प विभाग क्र. २ ओगलेवाडी यांचे कब्जात दिनांक २०/१०/२००५ रोजी दिले. त्यानुसार फेरफार नंबर २७३३ ने दावा मिळकत अ मधून २ हेक्टर २० आर क्षेत्र कमी झाले. त्या २ हेक्टर २० आर क्षेत्रास गट नंबर ९२७/ब देण्यात आला व दावा मिळकत अ चे उर्वरीत क्षेत्र ५ हेक्टर ०६ आर यास गट नंबर ९२७/अ देण्यात आला.

गट नंबर ९२७/अ मधील १ हेक्टर ५४ आर क्षेत्र मा.भुमि संपादन अधिकारी क्र.१ सांगली यांचे आदेश क्रमांक SPL/LAQ/SR/2560/2009 चे दिनांक ६/३/२००९ च्या आदेशानुसार वादी व प्रतिवादी यांचे कब्जातुन काढून घेवून कार्यकारी अभियंता टेंभू उपसा जलसिंचन प्रकल्प विभाग क्र. २ ओगलेवाडी यांच्या कब्जात दिले. त्यानुसार फेरफार नंबर ४१०२ तयार झाला. गट नंबर ९२७/अ मधील १ हेक्टर ५४ आर क्षेत्र हे त्या गटातील सर्व हिस्सेदारांचे संपादन झाले होते. ते केवळ वादींच्या हिश्याचे संपादन झाले नव्हते.

प्रतिवादी क्र. १ ने निवासी नायब तहसिलदार यांचे कडे अर्ज देवून १ हेक्टर ५४ आर क्षेत्र हे वादींच्या हिश्याचे संपादन झाले म्हणून वादींचे क्षेत्र कमी करावे अशी विनंती केली. त्यानुसार तहसिलदार यांनी एस.आर.नंबर ६/२०१६ चा आदेश पारीत करुन वादींचे क्षेत्र कमी केले व प्रतिवादींची जादा क्षेत्रास नोंद केली. त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१ ते ४ हे ते जादा क्षेत्र तबदिल करण्याच्या विचारात आहेत. तसेच वादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावण्याच्या विचारात आहेत. म्हणून प्रतिवादींना तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी अशी वादींनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दावा समन्स तसेच निशाणी ५ वरील अर्जाची

कारणे दाखवा नोटीसीची बजावणी झालेनंतर ते दाव्याकामी हजर राहिले परंतु त्यांनी म्हणणे दाखल न केल्याने निशाणी ५ वरील अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

४. वादींच्या अर्जातील कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत केले आहे का? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे असे वादींनी शाबीत केले आहे का ? | होकारार्थी |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होईल असे वादींनी शाबीत केले आहे का ? | होकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | नि. ५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे |

## कारणमिमांसा

५. वादींतर्फे वकील श्री.के.जी.हजारे यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दे क्र. १ ते ४ करीता**

६. वादींनी खालील कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

| अ.क्र | कागदपत्र | निशाणी |
|---|---|---|
| १. | दावा मिळकती अ ते ड चे ७/१२ उतारे | ८ ते ११ |
| २. | दिनांक २०/१०/२००५ रोजीची कब्जेपट्टी | १२ |
| ३. | फेरफार नंबर २७३३ | १३ |
| ४. | फेरफार नंबर ४१०२ | १४ |
| ५. | दिनांक २३/०७/२००७ रोजीचा भुमि संपादन निवाडा | ३/०८ |
| ६. | एस.आर.नंबर ६/२०१६ मधील ओदश | ३/९ |

७. प्रस्तुत दाव्यात निशाणी ५ वरती प्रतिवादींनी म्हणणे दाखल न केल्याने निशाणी ५ वरील अर्जातील कथने वादींनी सक्त पुराव्यानिशी शाबीत करणे आवश्यक आहे.

८. दावा मिळकत अ गट नंबर ९२७ चे एकूण क्षेत्र ७ हेक्टर २६ आर आहे. त्यापैकी २ हेक्टर २० आर क्षेत्र भुमि संपादन विशेष अधिकारी मिरज यांनी टेंभू उपसा जलसिंचन प्रकल्पाकरीता कब्जात घेतले आहे. त्या २ हेक्टर २० आर क्षेत्राचा गट नंबर ९२७/ब तयार झाला असून ती दावा मिळकत ब आहे. त्यानंतर पुन्हा गट नंबर ९२७ मधील १ हेक्टर ५४ आर क्षेत्र भुमिसंपादन अधिकारी सांगली यांनी टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाकरीता ताब्यात घेतले आहे. त्या १ हेक्टर ५४ आरचा गट नंबर ९२७/अ/२ तयार झाला असून ती दावा मिळकत क आहे. ९२७ मधील शिल्लक राहिलेले क्षेत्र ३ हेक्टर ५२ आरचा गट नंबर ९२७/अ/१ तयार झाला असून ती दावा मिळकत क आहे.

९. गट नंबर ९२७/ब व गट नंबर ९२७/अ/२ चे ७/१२ उतारे दाखल असून त्यांचे अवलोकन करता गट नंबर ९२७ मधील २ हेक्टर २० आर व १ हेक्टर ५४ आर क्षेत्र टेंभू उपसा सिंचन प्रकल्पासाठी संपादीत झाल्याचे स्पष्ट होते. दिनांक २०/१०/२००५ रोजीची कब्जेपट्टी व फेरफार नंबर २७३३ चे अवलोकन करता गट नंबर ९२७ मधील सर्व हिस्सेदारांचे मिळून २ हेक्टर २० आर क्षेत्र संपादीत झाल्याचे देखिल स्पष्ट होते. फेरफार नंबर ४१०२ व भुमि संपादन अधिकारी यांचे कडील दिनांक २३/०७/२००७ रोजीच्या न्यायनिवाडयाचे अवलोकन करता गट नंबर ९२७ मधील सर्व सह हिस्सेदारांचे १ हेक्टर ५४ आर क्षेत्र टेंभू उपसा प्रकल्पाकरीता संपादीत झाल्याचे देखिल स्पष्ट होते. यावरुन हे शाबीत होते की, टेंभू उपसा प्रकल्पाकरीता केवळ वादींच्या हिश्याचे क्षेत्र संपादीत झालेले नाही.

१०. एस.आर.नंबर ६/२०१६ च्या आदेशाचे अवलोकन करता टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाकरीता २ हेक्टर २० आर व १ हेक्टर ५४ आर क्षेत्र संपादीत झाल्यानंतर उर्वरीत क्षेत्र ३ हेक्टर ५२ आर नमुद करताना केवळ वादींचे क्षेत्र कमी करुन प्रतिवादी क्र. १ ते ४ चे क्षेत्र आहे तसेच ठेवल्याचे दिसून येते. यावरुन प्रतिवादींच्या नावावर टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाकरीता त्यांचे क्षेत्र संपादीत होवून देखिल जादा क्षेत्र नमुद केल्याचे शाबीत

होते. प्रतिवादींच्या नावे जादा क्षेत्र नमुद असल्याने ते वादींचा दावा मिळकतीतील हक्क डावलून वादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावतील किंवा जादा क्षेत्र तबदील करतील ही वादींना वाटणारी भिती रास्त आहे. तसे झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. म्हणून मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्रमांक ४ करीता खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. वादी यांचा निशाणी ५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांच्या नावे नमुद असलेले दावा मिळकतीचे जादा क्षेत्र तबदिल करु नये तसेच वादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावू नये अशी त्यांना तुर्तातुर्त मनाई देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

PRAJKTA RAJEEV SABNIS

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2024.04.15 17:41:49 +05'30'

कडेगांव
**(प्राजक्ता रा. सबनीस)**

दि. ०४/०५/२०२४
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव .